# ३१. आमची सहल




• **वाचा.**

आमची सहल मधुबन बागेत गेली होती. बाग सुंदर आणि मोठी होती. बागेत विविध फुला-फळांची झाडे होती. झाडांवर पक्षी होते. सगळीकडे सुंदर हिरवळ होती. बागेत पाण्याचा हौद होता. हौदात कारंजे होते. घसरगुंडी, झोपाळा, सी-सॉ होते. सगळे खूप खेळले. खूप मजा आली.

बागेत सुंदर सुंदर फुले फुलली होती. फुलांभोवती रंगीबेरंगी फुलपाखरे फिरत होती. मला एक फूल खूप आवडले. ते फूल तोडावेसे वाटले. मी फुलाजवळ गेलो. फुलाला हात लावला; पण लगेच मला आठवले. बागेत शिरताना बाईंनी सूचना दिली होती - 'बागेत सगळीकडे फिरा. गमतीजमती पाहा. सुंदर पाने, फुले पाहा. मजा करा. खूप खेळा, पण कशाला हात लावू नका. पानेफुले तोडू नका. ती बागेची शोभा आहे.'

मी लगेच हात मागे घेतला. फुलांकडे पाहिले. झाडांवर फुले डोलत होती. सगळी मुले आनंदाने नाचत होती.

• **सांगा.**

(अ) सहल कोठे गेली होती ?

(आ) फुलाला हात लावताच मुलाला काय आठवले ?

(इ) बाईंनी कोणती सूचना दिली होती ?

8UP2NS

• **काय ते सांगा.**

(अ) सुंदर ......... (आ) सुंदर सुंदर ......... (इ) रंगीबेरंगी .........

• चित्रे पाहा. सांगा. वाचा.



मदन सकाळी लवकर उठतो.



राजू रोज दात घासतो.



मुले रोज मैदानावर खेळतात.




रामण्णा स्वतःचे सामान स्वतः नेतात.



चिनू चित्र रंगवतो.





जॉनला पक्षी पाहायला आवडतात.


































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

अमराठी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी सुलभभारती इ.3 री

₹ २४.००